मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482

पाणी वाया घालवाल तर कारवाई!

पाणी बचतीसाठी आयुक्तांचे कडक निर्देश; निष्काळजी कर्मचाऱ्यांना शिस्तभंगाचा इशारा

» पिंपरी | प्रतिनिधी

पाणी बचत करण्यासोबतच पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व संबंधित विभागांना तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत. याबाबतचे परिपत्रक आयुक्तांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आले आहे.

पाणी बचत व पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी देण्यात आलेल्या निर्देशांची अंमलबजावणी संबंधित विभागप्रमुखांनी त्यांच्या विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत करून घ्यावी. तसेच, या कामात दुर्लक्ष किंवा निष्काळजीपणा केल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असेही परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

पिंपरी चिंचवड शहरासाठी पवना धरणातून ६.५५ टीएमसी, भामा आसखेड धरणातून २.१५ टीएमसी व आंद्रा धरणातून १.२९ टीएमसी असे एकूण ९.९९ टीएमसी पाणी आरक्षण मंजूर आहे. शहराची अंदाजित लोकसंख्या ३८ लाख असून, शहरात दररोज सुमारे ६५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा उपलब्ध होत असून, सध्या वितरण व्यवस्थेनुसार शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

पवना धरणामध्ये १४ ऑक्टोबर २०२६ अखेर ९७.१७ टक्के, तर आंद्रा धरणामध्ये ९५.८० टक्के पाणीसाठा होता. सप्टेंबर २०२६ मध्ये परतीचा पाऊस न झाल्याने उपलब्ध पाणीसाठा व मागील वर्षाचा अनुभव विचारात घेऊन पाणी बचतीच्या अनुषंगाने विविध उपाययोजना राबवण्याचे निर्देश आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी दिले आहेत. यामध्ये महापालिकेची मुख्य प्रशासकीय इमारत, क्षेत्रीय कार्यालये, रुग्णालये, शाळा, भाजी मंडई तसेच महापालिकेच्या इतर इमारतींमधील नळ व पाणीपुरवठा उपकरणांची तपासणी करावी. पाणीगळती आढळल्यास तातडीने दुरुस्ती करून पाण्याचा अपव्यय टाळावा, असे निर्देश स्थापत्य व पाणीपुरवठा विभागांना देण्यात आले आहेत.

तर शिक्षण विभागाने शाळांमधून विद्यार्थ्यांमध्ये पाणी बचतीविषयी जनजागृती करावी. आरोग्य विभागाने सार्वजनिक स्वच्छतागृहांसह विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या इतर ठिकाणी गरजेपेक्षा अधिक पाणी वापरले जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. क्रीडा विभागाने मैदानांवर पाणी फवारण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर टाळून आवश्यकतेनुसार प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर संबंधित विभागाशी समन्वय साधून करावा आणि उद्यान विभागाने देखील झाडांना पाणी देण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर टाळून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर करण्याचे नियोजन करावे, अशा सूचनाही परिपत्रकात देण्यात आल्या आहेत.

पाणी गळतीच्या तक्रारींचे तातडीने निराकरण महापालिकेच्या सर्व इमारतींमधील पाणीगळतीची नियमित तपासणी करणे, आढळलेली गळती संबंधित विभागास तात्काळ कळवून दुरुस्ती पूर्ण होईपर्यंत पाठपुरावा करणे आणि दुरुस्तीनंतरही गळती होणार नाही, यासाठी सातत्याने देखरेख ठेवणे, अशा सूचनाही सर्व संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत. याशिवाय, पाणीपुरवठा विभागाने माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या समन्वयाने भौगोलिक स्थानाच्या आधारे (जीपीएस) पाणीगळतीच्या तक्रारी नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी. प्राप्त तक्रारींचे वेळेत निराकरण करून दुरुस्तीनंतर पुन्हा गळती होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय, पाण्याचा अपव्यय रोखण्यामध्ये प्रभावी कामगिरी करणाऱ्या प्लंबरचा सत्कार करण्यात यावा, अशा सूचनाही संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत.

> "पाणी बचतीसाठी प्रत्येक विभागाने आपल्या कार्यक्षेत्रात नियमित तपासणी करून आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे. शाळा, उद्याने, सार्वजनिक स्वच्छतागृहे आणि अन्य महापालिका आस्थापनांमध्ये पिण्याच्या पाण्याचा अनावश्यक वापर होणार नाही, याची दक्षता घेतली जात आहे. गळतीच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करून पाणी बचतीच्या उपाययोजनांचा नियमित आढावा घेण्याच्या सूचना संबंधित विभागांना दिल्या आहेत."
>
> -डॉ. विजय सूर्यवंशी,
> **आयुक्त महापालिका**

मोशी केंद्रावर पदवीधर निवडणुकीत मतदारांचा मोठा उत्साह!

» पिंपरी | प्रतिनिधी

पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदार संघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी मोशी परिसरात अत्यंत उत्साही आणि शांततापूर्ण वातावरणात मतदान पार पडले. सकाळपासूनच मतदान केंद्रांवर मतदारांच्या रांगा लागल्याचे पाहायला मिळाले, ज्यामध्ये महिला पदवीधर मतदारांचा सहभाग विशेषत्वाने लक्षवेधी ठरला. मतदार केंद्राबाहेर मतदारांशी संवाद साधला असता महायुतीच्या बाजूने स्पष्ट आणि अनुकूल वातावरण असल्याचे जाणवत होते.

मोशी परिसरातील केंद्र क्रमांक ११०, १११, ११२ आणि ११३ या चारही मतदान केंद्रांवर दिवसभरात एकूण चार टप्प्यांत दर दोन तासांनी मतदानाची आकडेवारी नोंदवली गेली.

सकाळी ८ ते १० या पहिल्या टप्प्यात मतदानाला संथ सुरुवात झाली, मात्र १० ते १२ च्या दुसऱ्या आणि १२ ते २ च्या तिसऱ्या टप्प्यात मतदानाचा वेग चांगलाच वाढला. अखेर दुपारी ४ वाजेपर्यंत झालेल्या चौथ्या फेरीअखेर मोशी केंद्रावर एकूण १८०२ नोंदणीकृत मतदारांपैकी १००९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला, ज्यानुसार मोशी केंद्रावर एकूण ५५.९९ टक्के मतदान झाले. यामध्ये केंद्रनिहाय विचार केल्यास केंद्र क्रमांक ११० वर ३१३ (६९.२४%), केंद्र १११ वर २९१ (६४.५२%), केंद्र ११२ वर २०७ (४६.१०%) तर केंद्र ११३ वर १९८ (४४.००%) मतदान झाले. एकूण मतदानामध्ये ५६१ पुरुष आणि तब्बल ४४८ महिला मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावून लोकशाहीच्या या उत्सवात मोलाचा सहभाग नोंदवला.

महिलांची ही लक्षणीय उपस्थिती आणि महायुतीला मिळणारा वाढता पाठिंबा यामुळे निवडणूक निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पथनाट्यातून स्वच्छतेचा जागर!

ताथवडेतील विद्यार्थ्यांनी दिला स्वच्छतेचा धडा; कचरा वर्गीकरणाचा संदेश

पिंपरी | प्रतिनिधी

स्वच्छ शहराच्या निर्मितीसाठी नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने ताथवडे येथील जिल्हा परिषद शाळेत पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांसह नागरिकांना कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन, सार्वजनिक स्वच्छता आणि प्लास्टिकचा वापर टाळण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यासाठी विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून ताथवडे येथील जिल्हा परिषद शाळेत पथनाट्याच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश देण्यात आला.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून स्वच्छतेविषयी प्रभावी संदेश दिला. ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे जमा करणे, रस्त्यावर कचरा न टाकणे, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखणे आणि प्लास्टिकचा वापर टाळणे या विषयांवर विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. स्वच्छ शहर घडविण्यासाठी प्रशासनाच्या प्रयत्नांसोबतच नागरिकांचा सक्रिय सहभागही तितकाच महत्त्वाचा असल्याचे या माध्यमातून अधोरेखित करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच स्वच्छतेच्या सवयी रुजविणे आणि त्यांच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश घराघरांत पोहोचविणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. दैनंदिन जीवनात स्वच्छतेच्या नियमांचे पालन केल्यास परिसर स्वच्छ ठेवण्यास मदत होते, याची जाणीवही विद्यार्थ्यांना करून देण्यात आली.

या उपक्रमाला 'ज' क्षेत्रीय कार्यालयाच्या क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड, सहाय्यक आरोग्य अधिकारी शांताराम माने आणि आरोग्य निरीक्षक कोमल फर्डे यांचे मार्गदर्शन लाभले.

> "स्वच्छ आणि सुंदर शहराची निर्मिती करण्यासाठी नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच स्वच्छतेच्या चांगल्या सवयी रुजविल्यास त्याचा सकारात्मक परिणाम कुटुंबावर आणि समाजावरही होतो. कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता आणि प्लास्टिकचा वापर टाळणे यांसारख्या सवयी प्रत्येकाने अंगीकाराव्यात. स्वच्छ शहर घडविण्यासाठी नागरिकांनी महापालिकेच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा."
>
> -डॉ. विजय सूर्यवंशी,
> **आयुक्त महापालिका**

मोशी दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांचा उपोषणाचा इशारा!

पिंपरी | प्रतिनिधी

मोशी कचरा डेपो दुर्घटनेत कुटुंबातील कर्ता पुरुष गमावलेल्या नातेवाईकांचा आर्थिक मदतीसाठीचा संघर्ष अद्याप संपलेला नाही. महापालिकेकडून आर्थिक मदत मिळाली असली, तरी संबंधित कंपनीकडून अद्याप कोणतीही मदत मिळाली नसल्याचा दावा मृत कामगारांच्या नातेवाईकांनी केला आहे.

राज्य शासनाच्या मदतीबाबतही संभ्रम कायम असल्याने दिवाळीच्या तोंडावर या कुटुंबांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. प्रशासनाकडून स्पष्ट उत्तर मिळत नसल्याने संतप्त झालेल्या नातेवाईकांनी मुलाबाळांसह उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आवारात पत्रकारांशी चर्चा सुरू असताना मृत कामगारांचे भाऊ, पत्नी आणि अन्य नातेवाईक तेथे आले. त्यांनी आपली व्यथा मांडत आर्थिक मदतीसाठी वारंवार पाठपुरावा करूनही अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचे सांगितले. दुर्घटनेत घरातील कर्ता पुरुष गमावल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण आणि भविष्यातील जबाबदाऱ्या पार पाडताना अडचणी येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्य शासनाकडून आर्थिक मदत देण्याचे आश्वासन मिळाले होते. त्यानुसार नातेवाईकांनी तहसीलदार कार्यालयाकडे पाठपुरावा केला. मात्र, महापालिकेने दिलेली मदत हीच राज्य शासनाची मदत असल्याचे सांगण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे शासनाकडून स्वतंत्र मदत मिळणार की नाही, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

संविधान शिल्पाची मोडतोड भोवली; माजी नगरसेवकावर गुन्हा!

पिंपरी | प्रतिनिधी

सांगवी येथील संविधान चौकातील शिल्प, गोलाकार भिंत आणि चौथऱ्याच्या देखभाल-दुरुस्तीच्या कामावरून वाद निर्माण झाला असून, या प्रकरणी माजी नगरसेवक संतोष कांबळे यांच्यासह तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीच्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली.

दरम्यान, या प्रकरणामुळे राजकीय वातावरण तापले असून, काँग्रेसने भाजप नेत्यांवर निशाणा साधत कारवाईच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

सांगवीतील संविधान चौकातील शिल्प, गोलाकार भिंत आणि चौथऱ्याच्या देखभाल व दुरुस्तीचे काम महापालिकेच्या स्थापत्य विभागाकडून कंत्राटदाराला देण्यात आले होते. मात्र, या कामाची प्रक्रिया आणि परिसरातील अतिक्रमणाचा मुद्दा यावरून वाद निर्माण झाला. त्यानंतर सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाल्याच्या कारणावरून पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली.

या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी माजी नगरसेवक संतोष कांबळे यांच्यासह जेसीबी चालक-मालक आणि एका मजुराविरोधात गुन्हा नोंदवला आहे. या कारवाईमुळे सांगवी परिसरात चर्चेला उधाण आले असून, या प्रकरणातील नेमकी वस्तुस्थिती काय, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

या प्रकरणावर काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली आहे. संविधान चौकातील शिल्प आणि चौथऱ्याच्या कामासंदर्भात योग्य कार्यवाही करण्याऐवजी राजकीय दबावातून कारवाई झाल्याचा आरोप काँग्रेसकडून करण्यात आला आहे. महापालिका प्रशासनाच्या भूमिकेवरही पक्षाने प्रश्न उपस्थित केले आहेत.

काँग्रेसने या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे संविधान चौकातील काम, अतिक्रमणाचा मुद्दा आणि दाखल झालेला गुन्हा याभोवती राजकीय संघर्ष तीव्र होण्याची शक्यता आहे.

पाणी योजनांचा बोजवारा! जिल्हा परिषदेत प्रशासनाला सदस्यांचा घेराव

गावोगावी पाणीटंचाई; आठवडाभरात कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे अध्यक्षांचे निर्देश

» पुणे | प्रतिनिधी

जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांची रखडलेली कामे, वारंवार पाठपुरावा करूनही गावांना न मिळणारे पाणी आणि वाढत्या टंचाईमुळे जिल्हा परिषद प्रशासनाविरोधात सदस्यांनी आक्रमक भूमिका घेतली. कडूस, मुळशी आणि बेलना प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांसह विविध योजनांच्या दुरवस्थेवरून सर्वसाधारण सभेत प्रशासनाला धारेवर धरण्यात आले. पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. दरम्यान, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाने आठवडाभरात आवश्यक कार्यवाही पूर्ण करून अहवाल सादर करावा, असे निर्देश जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांनी दिले.

अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांच्या अध्यक्षतेखाली संभाव्य पाणीटंचाई आणि त्यावरील उपाययोजनांच्या आराखड्याबाबत सर्वसाधारण सभा झाली. मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, उपाध्यक्ष विवेक वळसे-पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे यांच्यासह विविध विषय समित्यांचे सभापती उपस्थित होते. पाणीटंचाईचा आराखडा दोन ते तीन दिवसांत अंतिम करून जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

कडूस प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची कामे अपूर्ण असल्याने संबंधित गावांना पाणी मिळत नसल्याचा मुद्दा तनुजा घनवट यांनी उपस्थित केला. खेड तालुक्यातील वरुडे-बाबुरव परिसरात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अर्धवट योजनांमुळे पाणीटंचाई गंभीर बनली आहे. नागरिकांसोबतच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न निर्माण झाल्याचे दीप्ती भोगाडे यांनी निदर्शनास आणून दिले.

मुळशी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील रखडलेल्या कामांकडे गटनेते शिवाजी बुचडे यांनी लक्ष वेधले. या प्रश्नावर स्वतंत्र बैठक घेण्यात येईल, असे अध्यक्ष जगदाळे यांनी स्पष्ट केले. मात्र, योजना पूर्ण होण्यास विलंब होत असल्याने नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

जुन्नर तालुक्यातील बेलना प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतून आठ-आठ दिवस पाणी मिळत नसल्याची तक्रार स्मिता कणसे यांनी केली. मोराची चिंचोली आणि कानूर मेसाई येथील पाणीप्रश्न स्वाती पाचुंदकर यांनी मांडला. गटनेत्या सुवर्णा दरेकर आणि प्रीती थोरात यांनी सातगाव पठार तसेच आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील पाणीटंचाईकडे प्रशासनाचे लक्ष वेधले.

ग्रामीण भागात पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर असताना हातपंपांच्या दुरुस्तीसाठी आवश्यक कर्मचारी आणि साधनसामग्रीच अपुरी असल्याचा मुद्दा करण खलाटे यांनी उपस्थित केला. रूपाली कोंडे यांनी शिवगंगा खोऱ्यातील अपुऱ्या पाणी योजनेची समस्या मांडली. खेड तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांचा पाणीटंचाई आराखड्यात समावेश करण्याची मागणी विजयसिंह शिंदे यांनी केली.

एकीकडे पाणीपुरवठा योजनांची कामे रखडलेली, तर दुसरीकडे देखभाल आणि दुरुस्तीसाठी पुरेशी यंत्रणा नसल्याने ग्रामीण भागातील नागरिकांचे हाल होत आहेत. त्यामुळे केवळ आराखडे तयार न करता प्रत्यक्ष कामांना गती देण्याची गरज सदस्यांनी अधोरेखित केली.

खडकवासला धरणातून पिण्यासाठी होणाऱ्या पाणीपुरवठ्यात २० टक्के कपात करण्यात आल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली. खरीप हंगामानंतर रब्बी पिकांसाठी आवर्तन दिले जाईल; मात्र उन्हाळ्यात आवर्तन सोडले जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

पाणी योजनांच्या कामांना गती देण्याचे निर्देश!

रखडलेल्या पाणी योजनांची कामे तातडीने पूर्ण करणे, टंचाईग्रस्त गावांना दिलासा देणे आणि उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे, ही प्रशासनासमोरील प्रमुख आव्हाने आहेत. त्यामुळे आठवडाभरात कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या निर्देशांनंतर संबंधित विभाग प्रत्यक्षात किती वेगाने काम करतात, याकडे आता लक्ष लागले आहे.

बोपदेव घाटात टेम्पोची कारला धडक; कार थेट दरीत कोसळली!

» पुणे | प्रतिनिधी

बोपदेव घाटात कोंबडी वाहतूक करणाऱ्या टेम्पोने कारला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने कार थेट दरीत कोसळल्याची घटना शनिवारी (दि. २२) मध्यरात्री बाराच्या सुमारास घडली. या भीषण अपघातात कारचालक सुदैवाने बचावला असून, त्याच्या हाताला किरकोळ खरचटले. मात्र, अपघातानंतर जखमी चालकाची मदत न करता टेम्पोचालक घटनास्थळावरून पसार झाला. याप्रकरणी येवलेवाडी पोलिसांनी टेम्पोचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवाजी विठ्ठल भोसले (वय ४५, रा. पणदरे, ता. बारामती, जि. पुणे) हे शनिवारी (दि. २२) मध्यरात्री बाराच्या सुमारास कोंढव्यातील बोपदेव घाटातून कारने प्रवास करत होते. रात्रीच्या वेळी घाटातून जात असताना त्यांच्या कारच्या पाठीमागून कोंबडी वाहतूक करणारा पिकअप टेम्पो येत होता. यावेळी टेम्पोचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले किंवा त्याने निष्काळजीपणे वाहन चालविल्याने टेम्पोने भोसले यांच्या कारला पाठीमागून जोरदार धडक दिली. या धडकेमुळे कार अचानक अनियंत्रित झाली. चालक भोसले यांनी कार सावरण्याचा प्रयत्न केला; मात्र कारवरील नियंत्रण सुटल्याने कार रस्त्याच्या बाजूला असलेल्या दरीत कोसळली. मध्यरात्रीच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

कार दरीत कोसळल्यानंतर ती दरीतील उतारावर अडकली. त्यामुळे कार आणखी खोलवर जाण्यापासून बचावली आणि मोठी दुर्घटना टळली. या अपघातात कारचालक शिवाजी भोसले यांना गंभीर दुखापत झाली नाही. त्यांच्या हाताला खरचटले असून, सुदैवाने त्यांचा जीव वाचला. कार थेट दरीत कोसळल्याने अपघाताची तीव्रता लक्षात येत होती. अशा परिस्थितीत चालकाला गंभीर दुखापत होण्याची किंवा मोठी जीवितहानी होण्याची शक्यता होती. मात्र, कार उतारावर अडकल्याने अनर्थ टळला. बोपदेव घाटासारख्या वळणावळणाच्या आणि उताराच्या मार्गावर रात्रीच्या वेळी वाहन चालविताना विशेष काळजी घेण्याची गरज या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाली आहे.

दरम्यान, अपघात घडवल्यानंतर टेम्पोचालकाने घटनास्थळी थांबून कारचालकाची विचारपूस करणे किंवा त्याला मदत करणे अपेक्षित होते. मात्र, अपघातानंतर मदत न करता टेम्पोचालक घटनास्थळावरून पसार झाला. त्यामुळे अपघातग्रस्त चालकाला मदतीसाठी इतरांवर अवलंबून राहावे लागले. अपघातानंतर जखमी व्यक्तीला मदत न करता निघून जाण्याच्या या प्रकारामुळे वाहनचालकांच्या जबाबदारीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. घाटमार्गावर वाहन चालविताना वेगावर नियंत्रण ठेवणे, सुरक्षित अंतर राखणे आणि इतर वाहनांची काळजी घेणे किती महत्त्वाचे आहे, हे या घटनेतून स्पष्ट झाले.

या प्रकरणी शिवाजी भोसले यांनी येवलेवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीच्या आधारे पोलिसांनी कोंबडी वाहतूक करणाऱ्या पिकअप टेम्पोचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. अपघात नेमका कशामुळे घडला, याबाबत पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे. अपघातानंतर पसार झालेल्या टेम्पोचालकाबाबतही तपास सुरू असून, या प्रकरणात पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. पोलिस उपनिरीक्षक खराडे या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

कात्रज डेअरीचे दूध खरेदी दर वाढले; शेतकऱ्यांना दिलासा!

प्रतिलिटर एक रुपयाची वाढ; गाय दूध ४३, तर म्हैस दूध ५५.२० रुपये!

पुणे | प्रतिनिधी

चारा, वैरण आणि वाहतूक खर्चात सातत्याने वाढ होत असल्याने पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाने (कात्रज डेअरी) दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी गाय आणि म्हशीच्या दूध खरेदी दरात प्रतिलिटर एक रुपयाने वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. वाढत्या उत्पादन खर्चामुळे दुग्ध व्यवसाय चालविणे शेतकऱ्यांसाठी आव्हानात्मक बनत असताना खरेदी दरात झालेल्या या वाढीमुळे त्यांना काही प्रमाणात आर्थिक आधार मिळणार आहे. विशेष म्हणजे, शेतकऱ्यांकडून दूध खरेदी करण्याचे दर वाढविण्यात आले असले, तरी ग्राहकांना विक्री करण्यात येणाऱ्या दुधाच्या दरात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. त्यामुळे दूध उत्पादकांना वाढीव मोबदला मिळणार असून ग्राहकांवरील अतिरिक्त आर्थिक भारही टळणार आहे.

नवीन दरानुसार, ३.५ फॅट आणि ८.५ एसएनएफ असलेल्या गाय दुधाचा खरेदी दर प्रतिलिटर ४३ रुपये झाला आहे. तर ६.० फॅट आणि ९.० एसएनएफ असलेल्या म्हशीच्या दुधासाठी प्रतिलिटर ५५.२० रुपये दर निश्चित करण्यात आला आहे. यापूर्वीच्या दरात प्रतिलिटर एक रुपयाची वाढ करण्यात आल्याने दूध उत्पादकांना त्यांच्या पुरवठ्यानुसार अधिक मोबदला मिळणार आहे. चारा, वैरण, पशुखाद्य आणि वाहतूक यांसारख्या खर्चात वाढ होत असल्याने दूध उत्पादनाचा एकूण खर्चही वाढत आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना त्यांच्या दुधाला योग्य दर मिळावा आणि दुग्ध व्यवसाय आर्थिकदृष्ट्या टिकून राहावा, या उद्देशाने संघाच्या संचालक मंडळाने हा निर्णय घेतल्याची माहिती अध्यक्ष अरुण चांभारे यांनी दिली

दूध आणि दुग्धजन्य पदार्थांची बाजारातील वाढती मागणी लक्षात घेता दर्जेदार दुधाचा नियमित पुरवठा होणे आवश्यक आहे. त्यासाठी दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे आणि त्यांना उत्पादनाच्या खर्चाच्या तुलनेत योग्य मोबदला मिळवून देणे महत्त्वाचे ठरते. शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केल्यास दुग्ध व्यवसायाला चालना मिळण्यास मदत होईल, अशी भूमिका संघाने घेतली आहे. दूध उत्पादनासाठी लागणाऱ्या साधनसामग्रीच्या किमती वाढत असताना खरेदी दरात केलेली वाढ शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे.

दरम्यान, दूध खरेदी दरात वाढ करूनही ग्राहकांसाठी विक्री दर कायम ठेवण्याचा निर्णय संघाने घेतला आहे. त्यामुळे सध्या तरी ग्राहकांना दूध खरेदीसाठी अधिक पैसे मोजावे लागणार नाहीत. शेतकऱ्यांचे हित जपतानाच ग्राहकांना दर्जेदार दूध उपलब्ध करून देण्यावर संघाचा भर असल्याचे व्यवस्थापकीय संचालक मनोज लिमये यांनी सांगितले. दूध उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती, दर्जेदार दूध संकलन आणि ग्राहकांचा विश्वास कायम ठेवणे, या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी संघ प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

ग्राहकांसाठी दूध दर कायम!

कात्रज डेअरीने गाय आणि म्हशीच्या दूध खरेदी दरात प्रतिलिटर एक रुपयाने वाढ केली आहे. गाय दुधाचा दर ४३ रुपये, तर म्हशीच्या दुधाचा दर ५५.२० रुपये प्रतिलिटर झाला आहे. मात्र, ग्राहकांसाठी विक्री दरात वाढ न करण्याचा निर्णय संघाने घेतला आहे.

पदवीधर-शिक्षक निवडणुकीत भरघोस मतदान!

पुणे | प्रतिनिधी

महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीसाठी शुक्रवारी (दि. २३) पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या पाच जिल्ह्यांत उत्साहात मतदान पार पडले. पदवीधर मतदारसंघात ६२.७८ टक्के, तर शिक्षक मतदारसंघात ८५.८७ टक्के मतदान झाले. मागील निवडणुकीच्या तुलनेत पदवीधर मतदारसंघातील मतदानात ४.८२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. या वाढलेल्या मतदानामुळे उमेदवारांची धाकधूक वाढली असून, आता २७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

दोन्ही मतदारसंघांतील एकूण ७७ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले आहे. पदवीधर मतदारसंघात ४७, तर शिक्षक मतदारसंघात ३० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. पाचही जिल्ह्यांत मतदारांनी मतदानाचा हक्क बजावल्याने निवडणूक प्रक्रियेला चांगला प्रतिसाद मिळाला. विशेषतः शिक्षक मतदारसंघातील मतदानाची टक्केवारी अधिक राहिल्याने निकालाबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

पदवीधर मतदारसंघात सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक ७१.४२ टक्के मतदान झाले. सातारा जिल्ह्यात ६६.८२ टक्के, कोल्हापूरमध्ये ६३.८३ टक्के, पुणे जिल्ह्यात ६१.४७ टक्के, तर सांगली जिल्ह्यात ५५.६२ टक्के मतदानाची नोंद झाली. शिक्षक मतदारसंघात सातारा जिल्ह्यात सर्वाधिक ८९.३९ टक्के मतदान झाले. सोलापूरमध्ये ८९ टक्के, कोल्हापूरमध्ये ८८.६२ टक्के, सांगलीमध्ये ८७.८३ टक्के, तर पुणे जिल्ह्यात ७८.०८ टक्के मतदान झाले.

पदवीधर मतदारसंघात भाजपच्या डॉ. स्मिता जाधव आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या हर्षदा देशमुख यांच्यात प्रतिष्ठेची लढत मानली जात आहे. दुसरीकडे, शिक्षक मतदारसंघात भाजपचे कौस्तुभ गावडे आणि काँग्रेसचे जयंत आसगावकर यांच्यात सामना रंगला आहे. दोन्ही मतदारसंघांतील प्रमुख उमेदवारांनी विजयासाठी जोरदार प्रयत्न केले होते. त्यामुळे वाढलेल्या मतदानाचा फायदा नेमका कोणाला होणार, याची चर्चा सुरू झाली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी विशेष प्रयत्न केले होते. पदवीधर मतदारसंघात उच्चशिक्षित मतदारांचा, तर शिक्षक मतदारसंघात शिक्षकांचा कौल निर्णायक ठरणार आहे. मतदानानंतर आता उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांकडून मतांच्या संभाव्य गणिताची जुळवाजुळव सुरू झाली आहे.

डिसेंबर २०२० मध्ये झालेल्या पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत ५७.९६ टक्के मतदान झाले होते. यंदा ही टक्केवारी ६२.७८ वर पोहोचली आहे. त्यामुळे मतदानात ४.८२ टक्क्यांची वाढ झाली आहे. मागील निवडणुकीत पदवीधर मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे अरुण लाड यांनी १ लाख २२ हजार १४५ मते मिळवत विजय मिळवला होता. शिक्षक मतदारसंघातून काँग्रेसचे जयंत आसगावकर यांनी २५ हजार ९८५ मते मिळवून बाजी मारली होती. यंदा भाजपने दोन्ही मतदारसंघांत विजयासाठी जोरदार तयारी केली होती. त्यामुळे मागील निवडणुकीतील निकालाची पुनरावृत्ती होणार की मतदार नवा कौल देणार, याबाबत उत्सुकता आहे.

पुणे विभागातील पाचही जिल्ह्यांतील मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्याने आता सर्वांचे लक्ष मतमोजणीकडे लागले आहे. वाढलेली मतदानाची टक्केवारी, प्रमुख उमेदवारांमधील चुरस आणि राजकीय पक्षांनी लावलेली ताकद यामुळे निकालाकडे संपूर्ण विभागाचे लक्ष असेल. २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणीनंतर पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघात मतदारांनी कोणाच्या बाजूने कौल दिला, हे स्पष्ट होणार आहे.